लोकमत

जिल्हा परिषद सीईओंचा पुढाकार : कक्षही स्थापन

# तक्रारींचा होणार निपटारा; तिसऱ्या गुरुवारी तक्रार निवारण दिन!

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** लोकाभिमुख व पारदर्शक कारभार आणखी गतिमान करण्याबरोबरच ग्रामीण भागातील नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी आता दर महिन्यातील तिसऱ्या गुरुवारी जिल्हा परिषदेत तक्रार निवारण दिन घेण्यात येणार आहे. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी बुधवारी परिपत्रक जारी केले.

ग्रामीण भागाचे मिनी मंत्रालय असलेल्या जिल्हा परिषदेत विविध कामानिमित्त ग्रामीण भागातील नागरिक येतात. ग्रामपंचायत किंवा पंचायत समिती स्तरावर एखाद्या तक्रारीचे निराकरण झाले नाही तर अनेकजण न्याय मिळेल या अपेक्षेतून जिल्हा परिषदेकडे धाव घेतात. अनेकवेळा संबंधित अधिकारी एखाद्या मिटिंगमध्ये किंवा दौऱ्यावर असल्याने संबंधित लाभार्थीला ताटकळत बसण्याशिवाय किंवा खाली हात घरी परत जाण्याशिवाय पर्याय नसतो. यामध्ये लोकांचा वेळ व पैसा खर्च होतो. ग्रामीण जनतेची ही गैरसोय दूर करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी पुढाकार घेतला असून, यापुढे दर महिन्यातील तिसऱ्या गुरुवारी जिल्हा परिषदेत तक्रार निवारण दिन घेण्याचे आदेश त्यांनी सामान्य प्रशासन विभागाला दिले. या आदेशाची अंमलबजावणी केली जाणार आहे. तक्रार निवारण दिनामुळे न्याय मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## समस्यांवर शोधला जाणार उपाय

जिल्हा परिषदेत दर महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी नागरिकांच्या समस्या ऐकून घेणे, तक्रारींवर चर्चा करणे आणि त्या सोडविण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहे. या दिवशी सर्व विभाग प्रमुख व तक्रारींशी संबंधित असलेले इतर कर्मचारी एकत्र बसून समोरासमोर त्या समस्येवर समाधान शोधण्याचा प्रयत्न करतील. प्रसंगानुरुप तक्रारीचे समाधान तात्काळ करण्यात येईल; परंतु एखादी समस्या तात्काळ सोडवता येणे शक्य नसल्यास संबंधित तक्रारकर्त्यास आवश्यकतेनुसार पुढच्या गुरुवारी बोलवण्यात येईल, असे जिल्हा परिषद प्रशासनाने स्पष्ट केले.

## सर्वांशी चर्चा अन् गुरुवार निश्चित

नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी सीईओ वाघमारे यांनी विभाग प्रमुखांशी चर्चा करीत तक्रार निवारण दिन घेण्याबाबतचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावाला विभाग प्रमुखांनी होकार दिल्याने तक्रार निवारण दिनासाठी दर महिन्यातील तिसरा गुरुवार निश्चित केले.

## दिशाभूल, चुकीची तक्रार नको

तक्रार निवारण दिन आहे म्हणून चुकीची किवा दिशाभूल करणारी तक्रार नको, असेही जिल्हा परिषद प्रशासनाने स्पष्ट केले. विनाकारण, चुकीच्या उद्देशाने, खोटी तक्रार करून शासन, प्रशासनाचा वेळ वाया घालू नये असे आवाहनही प्रशासनाने केले.

मोजक्या, नेमक्या व स्पष्ट शब्दात किमान १० वाक्यात लेखी स्वरुपात तक्रार नोंदवावी. एकावेळी एकाच विषयाची तक्रार स्विकारण्यात येईल. मुख्य तक्रारीसोबत, तक्रारीच्या अनुषंगाने इतर तपशिल जोडले तरी चालतील. तथ्यहिन, चुकीची तक्रार नसावी.

**- वैभव वाघमारे**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. वाशिम

# महिन्याचा तिसरा गुरुवार तक्रार निवारण दिवस!

## सीईओ करणार तक्रारींचा निपटारा

◆ **वाशीम, २१ फेब्रुवारी**

लोकांच्या तक्रारींचा वेळेत निपटारा करण्यासाठी व त्यांच्या समस्यांवर योग्य तोडगा काढण्यासाठी दर महिन्याच्या तिसऱ्या गुरूवारी जिल्हा परिषदेत तक्रार निवारण दिवस घेण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी काढले आहेत.

वाशीम जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर नव्याने रुजू झालेले वैभव वाघमारे यांनी आपल्या लोकाभिमुख आणि पारदर्शक कारभारामुळे वाशीमकरांवर आपली छाप पाडली आहे. महत्वाची बैठक असो चर्चा, सुनावणी, लोकांची तक्रार काहीही असो, त्यांच्या दालनाची दोन्ही दरवाजे सताड उघडीच असतात. अनेक वेळा लोक बैठका सुरू असतानाही तक्रार वा निवेदने घेऊन येतात.




जनतेच्या समस्या ऐकून घेताना जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे

२० रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात एका महत्त्वाच्या विषयावर सुनावणी सुरू असताना काही ग्रामस्थ आपल्या गावातील तक्रार घेऊन आले होते. सीईओ वाघमारे यांनी सुरुवातीला त्यांना नंतर या म्हणून परत पाठवले. परंतु काही क्षणात त्यांना दालनात बोलवून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. परंतु आलेल्या लोकांच्या समस्येचे काही कारणांमुळे संपूर्णपणे समाधान होऊ शकले नाही, ही बाब वाघमारे यांच्या लक्षात आली. त्यांनी तातडीने सर्व विभाग प्रमुखांना आपल्या कक्षात बोलावून याबाबत चर्चा केली.

आपला प्रस्ताव मांडला आणि जिल्हा परिषदेसाठी एक तक्रार निवारण दिवस ठरविण्यात आला. यासाठी तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्याचे निर्देश सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यशवंत सपकाळे यांना दिले. तसेच लोकांच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी प्रत्येक महिन्यातील तिसरा गुरूवार हा दिवस निवडण्यात आला.

या दिवशी फक्त लोकांच्या समस्या ऐकून घेतल्या जातील आणि त्यावर उपाय योजना करण्यात येतील. यामध्ये टपालाद्वारे नियमित येणाऱ्या तक्रारीसह प्रत्यक्ष लोकांनी आणलेल्या तक्रारीबाबत चर्चा करण्यात येणार आहे.

◀*(तभा वृत्तसेवा)*

दैनिक
दिव्य मातृछाया

# महिन्याच्या तिसरा गुरुवार तक्रार निवारण दिवस

## कक्ष स्थापन: जिल्हा परिषद सिईओसमक्ष समस्यांवर तोडगा

◆ दै. दिव्य मातृछाया
◆ फुलचंद भगत

**वाशिम** : लोकांच्या तक्रारीचा वेळेत निपटारा करण्यासाठी व त्यांच्या समस्यांवर योग्य तोडगा काढण्यासाठी दर महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी जिल्हा परिषदेत तक्रार निवारण दिवस घेण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी काढले आहेत. जिल्हा परिषदेकडे मिनी मंत्रालय म्हणुन पाहिले जाते. गाव आणि तालुका पातळीवर आपले काम झाले नाही म्हणुन लोक आपली तक्रार घेऊन मोठ्या अपेक्षेने मंत्रालय रुपी जिल्हा परिषदेत येतात. परंतु ज्यांच्याशी संबंधित तक्रार आहे ते साहेब कधी मिटींगमध्ये व्यस्त असतात तर कधी दौऱ्यावर. साहेब भेटले तर संबंधित कर्मचारी भेटतीलच याची खात्री नसते. अनेकवेळा महत्वाच्या बैठका सुरु असल्यामुळे लोकांना ताटकळत बसावे लागते. याध्ये लोकांचा वेळ व पैसा खर्च होतो. या पार्श्वभूमीवर सीईओ वाघमारे यांनी हा निर्णय घेतला आहे. वाशिम जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर नव्याने रुजू झालेले वैभव वाघमारे यांनी पहिल्या दिवसापासुनच आपल्या लोकाभिमुख आणि पारदर्शक कारभारामुळे वाशिमकरांवर आपली छाप पाडली आहे. महत्वाची बैठक असो... चर्चा, सुनावणी, लोकांची तक्रार... काहीही असो, त्यांच्या दालनाची दोन्ही दरवाजे सताड उघडीच असतात. अनेक वेळा लोक बैठका सुरू असतानाही तक्रार वा निवेदने घेऊन येतात. दि. 20 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात एका महत्त्वाच्या विषयावर सुनावणी सुरू असताना काही ग्रामस्थ आपल्या गावातील तक्रार घेऊन आले होते. सीईओ वाघमारे यांनी सुरुवातीला त्यांना नंतर या म्हणुन परत पाठवले परंतु काही क्षणात त्यांना दालनात बोलवुन त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. परंतु आलेल्या लोकांच्या समस्येचे काही कारणांमुळे संपूर्णपणे समाधान होऊ शकले नाही, ही बाब वाघमारे यांच्या लक्षात आली. त्यांनी तातडीने सर्व विभाग प्रमुखांना आपल्या कक्षात बोलावून याबाबत चर्चा केली. आपला प्रस्ताव मांडला आणि जिल्हा परिषदेसाठी एक तक्रार निवारण दिवस ठरविण्यात आला. यासाठी तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्याचे निर्देश सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यशवंत सपकाळे यांना दिले. तसेच लोकांच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी प्रत्येक महिन्यातील तिसरा गुरुवार हा दिवस निवडण्यात आला. या दिवशी फक्त लोकांच्या समस्या ऐकुन घेतल्या जातील आणि त्यावर उपाय योजना करण्यात येतील. यामध्ये टपालाद्वारे नियमित येणाऱ्या तक्रारीसह प्रत्यक्ष लोकांनी आणलेल्या तक्रारीबाबत चर्चा करण्यात येणार आहे. या दिवशी सर्व विभाग प्रमुख आणि तक्रारीशी संबंधित असलेले इतर कर्मचारी हे एकत्र बसून समोरासमोर त्या समस्येवर समाधान शोधतील. प्रसंगानुरुप तक्रारीचे समाधान तात्काळ करण्यात येईल परंतु जर एखादी समस्या जर तात्काळ सोडवता येणे शक्य नसल्यास संबंधित तक्रारकर्त्यास आवश्यकतेनुसार पुढच्या गुरुवारी बोलवण्यात येईल.

"लोकांनी मोजक्या आणि स्पष्ट शब्दात, लेखी स्वरुपात आपली तक्रार नोंदवावी. मुख्य तक्रारीसोबत, तक्रारीच्या अनुषंगाने इतर तपशिल जोडले तेरी चालतील. मात्र तक्रार ही जास्तीत जास्त 10 वाक्यात असावी. एकावेळी एकाच विषयाची तक्रार स्विकारली जाईल. लोकांनी विणाकारण अथवा चुकीच्या उद्देशाने, खोटी तक्रार करुन शासनाचा वेळ वाया घालवु नये.
वैभव वाघमारे, (भाप्रसे) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम



देशोन्नती

# महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी तक्रारींचे निवारण

## जिल्हा परिषद सिईओंसमक्ष समस्यांवर तोडगा




देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम** ■ लोकांच्या तक्रारीचा वेळेत निपटारा करण्यासाठी व त्यांच्या समस्यांवर योग्य तोडगा काढण्यासाठी दर महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी जिल्हा परिषदेत तक्रार निवारण दिवस घेण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी काढले आहेत.

जिल्हा परिषदेकडे मिनी मंत्रालय म्हणुन पाहिले जाते. गाव आणि तालुका पातळीवर आपले काम झाले नाही म्हणुन लोक आपली तक्रार घेऊन मोठ्या अपेक्षेने मंत्रालय रुपी जिल्हा परिषदेत येतात. परंतु ज्यांच्याशी संबंधित तक्रार आहे ते साहेब कधी मिटींगमध्ये व्यस्त असतात तर कधी दौऱ्यावर. साहेब भेटले तर संबंधित कर्मचारी भेटतीलच याची खात्री नसते. अनेकवेळा महत्वाच्या बैठका सुरु असल्यामुळे लोकांना ताटकळत बसावे लागते. याध्ये लोकांचा वेळ व पैसा खर्च होतो. या पार्श्वभूमीवर सीईओ वाघमारे यांनी हा निर्णय घेतला आहे.

वाशिम जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर नव्याने रुजू झालेले वैभव वाघमारे यांनी पहिल्या दिवसापासुनच आपल्या लोकाभिमुख आणि पारदर्शक कारभारामुळे वाशिमकरांवर आपली छाप पाडली आहे. महत्वाची बैठक असो चर्चा, सुनावणी, लोकांची तक्रार काहीही असो, त्यांच्या दालनाची दोन्ही दरवाजे सतत उघडीच असतात. अनेक वेळा लोक बैठका सुरू असतानाही तक्रार वा निवेदने घेऊन येतात.

२० फेब्रुवारी रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात एका महत्त्वाच्या विषयावर सुनावणी सुरू असताना काही ग्रामस्थ आपल्या गावातील तक्रार घेऊन आले होते. सीईओ वाघमारे यांनी सुरुवातीला त्यांना नंतर या म्हणुन परत पाठवले परंतु काही क्षणात त्यांना दालनात बोलवुन त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. परंतु आलेल्या लोकांच्या समस्येचे काही कारणांमुळे संपूर्णपणे समाधान होऊ शकले नाही, ही बाब वाघमारे यांच्या लक्षात आली. त्यांनी तातडीने सर्व विभाग प्रमुखांना आपल्या कक्षात बोलावून याबाबत चर्चा केली. आपला प्रस्ताव मांडला आणि जिल्हा परिषदेसाठी एक तक्रार निवारण दिवस ठरविण्यात आला. यासाठी तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्याचे निर्देश सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यशवंत सपकाळे यांना दिले.

तसेच लोकांच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी प्रत्येक महिन्यातील तिसरा गुरुवार हा दिवस निवडण्यात आला. या दिवशी फक्त लोकांच्या समस्या ऐकुन घेतल्या जातील आणि त्यावर उपाय योजना करण्यात येतील. यामध्ये टपालाद्वारे नियमित येणाऱ्या तक्रारीसह प्रत्यक्ष लोकांनी आणलेल्या तक्रारीबाबत चर्चा करण्यात येणार आहे. (जि.प्र.)

Washim Edition
Feb 22, 2024 Page No. 1

पुण्य नगरी

# मिनी मंत्रालयात आता जनता दरबार

## महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी आयोजन

वाशीम, दि. २० (प्रतिनिधी)

लोकांच्या तक्रारीचा वेळेत निपटारा करण्यासाठी व समस्यांवर योग्य तोडगा काढण्यासाठी दर महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी जिल्हा परिषदेत जनता-दरबार घेण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी काढले आहेत.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर नव्याने रुजू झालेले वैभव वाघमारे यांनी पहिल्या दिवसापासुनच आपल्या लोकाभिमुख आणि पारदर्शक कारभारामुळे वाशिमकरांवर छाप पाडली आहे. महत्वाची बैठक असो चर्चा, सुनावणी, लोकांची तक्रार काहीही असो, त्यांच्या दालनाची दरवाजे सताड उघडीच असतात. दरम्यान, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात आज २० रोजी एका महत्त्वाच्या विषयावर सुनावणी सुरू असताना काही ग्रामस्थ आपल्या गावातील तक्रार घेऊन आले असता सीईओंनी त्यांना दालनात बोलवुन त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. परंतु आलेल्या लोकांच्या समस्येचे काही कारणांमुळे समाधान होऊ शकले नाही, ही बाब वाघमारे यांनाही खटकली.त्यांनी तातडीने सगळ्या विभाग प्रमुखांना बोलावून याबाबत चर्चा केली. आपला प्रस्ताव मांडला आणि जिल्हा परिषदेत तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्याचे निर्देश सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यशवंत सपकाळे यांना दिले. तसेच सर्व विभागप्रमुखांच्या सहमतीने प्रत्येक महिन्यातील तिसरा गुरुवार हा दिवस निवडला. या दिवशी फक्त लोकांच्या समस्या ऐकुन घेतल्या जातील आणि त्यावर उपाय योजना करण्यात येतील असे ठरविण्यात आले. यामध्ये टपालाद्वारे नियमित येणाऱ्या तक्रारीसह प्रत्यक्ष लोकांनी आणलेल्या तक्रारीबाबत चर्चा करण्यात येणार आहे. या दिवशी सर्व विभाग प्रमुख आणि तक्रारीशी संबंधित असलेले इतर कर्मचारी हे एकत्र बसून समोरासमोर त्या समस्येवर समाधान शोधतील. एखाद्या तक्रारीचे समाधान तात्काळ होणार असेल तर त्यावर लगेच उपाययोजना करण्यात येईल परंतु जर एखादी समस्या जर तात्काळ सोडवता येणे शक्य नसल्यास संबंधित तक्रारकर्त्यास पुढच्या गुरुवारी बोलवण्यात येईल.



“नागरिकांनी तक्रारीच्या अनुषंगाने इतर तपशिल जोडण्यास हरकत नाही. मात्र, मोजक्या व स्पष्ट शब्दात तक्रारी लेखी स्वरुपात जास्तीत जास्त दहा वाक्यात नोंदवाव्यात. एकावेळी एकाच विषयाची तक्रार स्विकारली जाईल. लोकांनी विणाकारण अथवा चुकीच्या उद्देशाने, खोटी तक्रार करुन शासनाचा वेळ वाया घालवु नये.

–वैभव वाघमारे
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद वाशिम

सिटी न्यूज सुपरफास्ट
गुरूवार दि. २२ फेब्रुवारी २०२४

### आता जि. प. मध्ये कायदा व शिस्तीचे आचरण...

# महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी तक्रार निवारण

## कक्ष स्थापन: जिल्हा परिषद सिईओंसमक्ष समस्यांवर तोडगा काढण्याचे धोरण

● सिटी न्युज ब्युरो @वाशीम ●

लोकांच्या तक्रारीचा वेळेत निपटारा करण्यासाठी व त्यांच्या समस्यांवर योग्य तोडगा काढण्यासाठी दर महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी जिल्हा परिषदेत तक्रार निवारण दिवस घेण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी काढले आहेत.

जिल्हा परिषदेकडे मिनी मंत्रालय म्हणुन पाहिले जाते. गाव आणि तालुका पातळीवर आपले काम झाले नाही म्हणुन लोक आपली तक्रार घेऊन मोठ्या अपेक्षेने मंत्रालय रुपी जिल्हा परिषदेत येतात. परंतु ज्यांच्याशी संबंधित तक्रार आहे ते साहेब कधी मिटींगमध्ये व्यस्त असतात तर कधी दौऱ्यावर. साहेब भेटले तर संबंधित कर्मचारी भेटतीलच याची खात्री नसते. अनेकवेळा महत्वाच्या बैठका सुरु असल्यामुळे लोकांना ताटकळत बसावे लागते. याध्ये लोकांचा वेळ व पैसा खर्च होतो. या पार्श्वभूमीवर सीईओ वाघमारे यांनी हा निर्णय घेतला आहे.




'लोकांनी मोजक्या आणि स्पष्ठ शब्दात, लेखी स्वरुपात आपली तक्रार नोंदवावी. मुख्य तक्रारीसोबत, तक्रारीच्या अनुषंगाने इतर तपशिल जोडले तेरी चालतील. मात्र तक्रार ही जास्तीत जास्त १० वाक्यात असावी. एकावेळी एकाच विषयाची तक्रार स्विकारली जाईल. लोकांनी विणाकारण अथवा चुकीच्या उद्देशाने, खोटी तक्रार करुन शासनाचा वेळ वाया घालवु नये.'

**-वैभव वाघमारे, (भाप्रसे)** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम

वाशिम जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर नव्याने रुजू झालेले वैभव वाघमारे यांनी पहिल्या दिवसापासुनच आपल्या लोकाभिमुख आणि पारदर्शक कारभारामुळे वाशिमकरांवर आपली छाप पाडली आहे. महत्वाची बैठक असोष्ठ चर्चा, सुनावणी, लोकांची तक्रारष्ठ काहीही असो, त्यांच्या दालनाची दोन्ही दरवाजे सताड उघडीच असतात. अनेक वेळा लोक बैठका सुरू असतानाही तक्रार वा निवेदने घेऊन येतात.दि. २० रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात एका महत्त्वाच्या विषयावर सुनावणी सुरू असताना काही ग्रामस्थ आपल्या गावातील तक्रार घेऊन आले होते.

सीईओ वाघमारे यांनी सुरुवातीला त्यांना नंतर या म्हणुन परत पाठवले परंतु काही क्षणात त्यांना दालनात बोलवुन त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. परंतु आलेल्या लोकांच्या समस्येचे काही कारणांमुळे संपूर्णपणे समाधान होऊ शकले नाही, ही बाब वाघमारे यांच्या लक्षात आली. त्यांनी तातडीने सर्व विभाग प्रमुखांना आपल्या कक्षात बोलावून याबाबत चर्चा केली. आपला प्रस्ताव मांडला आणि जिल्हा परिषदेसाठी एक तक्रार निवारण दिवस ठरविण्यात आला. यासाठी तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्याचे निर्देश सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यशवंत सपकाळे यांना दिले. तसेच लोकांच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी प्रत्येक महिन्यातील तिसरा गुरुवार हा दिवस निवडण्यात आला. या दिवशी फक्त लोकांच्या समस्या ऐकुन घेतल्या जातील आणि त्यावर उपाय योजना करण्यात येतील. यामध्ये टपालाद्वारे नियमित येणाऱ्या तक्रारीसह प्रत्यक्ष लोकांनी आणलेल्या तक्रारीबाबत चर्चा करण्यात येणार आहे. या दिवशी सर्व विभाग प्रमुख आणि तक्रारीशी संबंधित असलेले इतर कर्मचारी हे एकत्र बसून समोरासमोर त्या समस्येवर समाधान शोधतील. प्रसंगानुरुप तक्रारीचे समाधान तात्काळ करण्यात येईल परंतु जर एखादी समस्या जर तात्काळ सोडवता येणे शक्य नसल्यास संबंधित तक्रारकर्त्यास आवश्यकतेनुसार पुढच्या गुरुवारी बोलवण्यात येईल.

**निवारण** | विशेष कक्ष के माध्यम से समस्याओं का होगा निवारण

# अब प्रति माह तीसरे गुरुवार को जिप में लगेगा जनता दरबार

जिला प्रतिनिधि | वाशिम

**नागरिकों की शिकायतों का समय पर निपटारा करने के साथही समस्याओं का उचित हल निकालने के लिए अब हर माह के तीसरे गुरुवार को जिला परिषद में जनता दरबार लेने के आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे ने निकाले है। जिला परिषद की ओर मिनी मंत्रालय के रुप में देखा जाता है और गांव एवं तहसीलस्तर पर अपने काम ना होने से नागरीक अपनी शिकायत लेकर मिनी मंत्रालय में आते है । लेकिन जिनसे सम्बंधित शिकायत होती है, वे कभी साहब के मिटींग में व्यस्त होने तो कभी दौरे पर होने की बात कहते है ।**




यदि साहब मिलते है तो सम्बंधित बाबु मिलेंगे ही इसकी कोई गारंटी नहीं होती । इस कारण जिला परिषद की प्रतिमा मलिन होने के साथही लोगों को भी समस्या होती है । वाशिम जिला परिषद के नवागत मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे ने पहले दिन से ही अपनी लोकाभिमुख और पारदर्शक कामकाज से वाशिमवासियों पर छाप छोड़ी है । महत्वपुर्ण बैठक हो या चर्चा, सुनवाई अथवा लोगों की शिकायत, उनके कक्ष के द्वार खुले रहते है । अनेक मर्तबा लोग बैठक शुरु रहते शिकायत और निवेदन लेकर आते है । इसबीच मुख्य कार्यकारी अधिकारी के कक्ष में मंगलवार 20 फरवरी को एक महत्वपूर्ण विषय पर सुनवाई शुरु रहते कुछ ग्रामिण अपने गांव की शिकायतें लेकर आए । सीईओ वाघमारे ने शुरुआत में उन्हें बाद में आने की बात कहकर लौटा दिया लेकिन कुछ क्षण में ही उन्हें कक्ष में बुलाकर उनकी बात सुनी । इस समय इन लोगों की समस्याओं का कुछ कारणों से समाधान नहीं हो पाने की बात सीईओ वाघमारे को खटकी । इस दिन सभी विभाग प्रमुख और शिकायत से सम्बंधित रहनेवाले अन्य कर्मचारी एकत्रित बैठकर आमने-सामने उन समस्याओं पर समाधान खोजेंगे । किसी शिकायत का समाधान तत्काल होता हो तो उन पर उसी समय उपाययोजना की जाएंगी । यदि कोई समस्या तत्काल सुलझाना संभव ना होने पर सम्बंधित शिकायकर्ता को अगले गुरुवार को बुलाया जाएंगा।

> नागरिकों के शिकायत के मद्देनज़र अन्य विवरण जोड़ने पर आपत्ति नहीं लेकिन चुनिंदा और स्पष्ट शब्दों में शिकायत लिखित स्वरुप में अधिकाधिक 10 वाक्यों में दर्ज कराएं । एक समय एक ही विषय की शिकायत स्वीकारी जाएंगी । लोग बिलावजह अथवा गलत उद्देश से शिकायत कर शासन का समय बर्बाद ना करें।
>
> **वैभव वाघमारे,** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिला परिषद वाशिम

# हर माह तीसरे गुरुवार को शिकायत निवारण

**प्रतिनिधि/प्रतिदिन अखबार**

**वाशिम, 21 फरवरी**- नागरिकों की शिकायतों का समय पर निपटारा व समस्याओं का समाधान करने के लिए हर माह के तीसरे गुरुवार को जिला परिषद में शिकायत निवारण दिवस आयोजित करें, ऐसे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे ने जारी किए हैं.

जिप को मिनी मंत्रालय कहा जाता है. गांव तथा तहसील स्तर पर काम न होने पर नागरिक बड़ी उम्मीद के साथ अपनी शिकायत लेकर जिप में पहुंचते हैं, लेकिन जिनसे मिलना है, वह साहब कभी दौरे पर रहते हैं तो कभी मीटिंग में व्यस्त. साहब मिले तो कई बार संबंधित कर्मचारी नहीं रहते. कई बार महत्वपूर्ण बैठक शुरू रहने से वह खत्म होने की राह देखनी पड़ती है. इसमें नागरिकों का समय व पैसा खर्च हो रहा है. इन सब बातों को देखकर सीईओ वाघमारे ने यह निर्णय लिया है. नवनियुक्त सीईओ ने पदभार संभालते ही पहले दिन से अपने लोकाभिमुख व पारदर्शी कामकाज की छाप छोड़ी है. महत्वपूर्ण बैठक हो या चर्चा इनके कक्ष के दोनों दरवाजे खुले रहते हैं. बैठक शुरू रहने पर भी नागरिक शिकायत या ज्ञापन सौंपने आते हैं.



**जिप के सीईओ के समक्ष समस्या का समाधान**

मंगलवार को सीईओ के कक्ष में महत्वपूर्ण विषय पर सुनवाई चल रही थी. ऐसे समय कुछ ग्रामवासी शिकायत लेकर आए थे. सीईओ ने उन्हें पहले बाद में आओ कहकर वापस भेज दिया और कुछ ही पल में उन्हें वापस बुलाकर उनकी बात सुनी. तुरंत सभी विभाग प्रमुखों को अपने कक्ष में बुलाकर चर्चा करते हुए एक शिकायत निवारण दिवस तय किया गया. इसके लिए शिकायत निवारण कक्ष की स्थापना करने के निर्देश उन्होंने उपमुख्य कार्यकारी अधिकारी यशवंत सपकाले को दिए. नागरिकों की समस्याओं के समाधान के लिए हर माह का तीसरा गुरुवार शिकायत निवारण दिवस के रूप में तय किया गया है. उस दिन पर लोगों की समस्याएं सुनकर उपाय योजनाएं तथा पोस्ट से प्राप्त शिकायतों के बारे में चर्चा की जाएगी. तत्काल समस्या का समाधान करना असंभव रहने पर उन्हें आवश्यकता के अनुसार अगले गुरुवार को बुलाया जाएगा.

## ज्यादा से ज्यादा 10 वाक्यों में करें शिकायत

नागरिक कम व स्पष्ट शब्दों में लिखित तौर पर अपनी शिकायत पेश करें. शिकायत के साथ अन्य दस्तावेज जोड़ें. ज्यादा से ज्यादा 10 वाक्यों में शिकायत करें. एक समय पर एक ही विषय की शिकायत स्वीकारी जाएगी. नागरिक बेवजह अथवा गलत उद्देश्य से झूठी शिकायत कर सरकार का समय बर्बाद न करें.

**- वैभव वाघमारे, मुख्य कार्यकारी अधिकारी वाशिम, जिप**

दैनिक विदर्भ जगत
www.vidarbhajagat.in
22 Feb 2024 - Page 4



# महिन्याच्या तिसरा गुरुवार तक्रार निवारण दिवस!

**विदर्भ जगत, वृत्तसेवा**

**वाशिम :** दि. २१/२/२०२४ लोकांच्या तक्रारीचा वेळेत निपटारा करण्यासाठी व त्यांच्या समस्यांवर योग्य तोडगा काढण्यासाठी दर महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी जिल्हा परिषदेत तक्रार निवारण दिवस घेण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी काढले आहेत. जिल्हा परिषदेकडे मिनी मंत्रालय म्हणुन पाहिले जाते. गाव आणि तालुका पातळीवर आपले काम झाले नाही म्हणुन लोक आपली तक्रार घेऊन मोठ्या अपेक्षेने मंत्रालय रुपी जिल्हा परिषदेत येतात. परंतु ज्यांच्याशी संबंधित तक्रार आहे ते साहेब कधी मिटींगमध्ये व्यस्त असतात तर कधी दौऱ्यावर. साहेब भेटले तर संबंधित कर्मचारी भेटतीलच याची खात्री नसते. अनेकवेळा महत्वाच्या बैठका सुरु असल्यामुळे लोकांना ताटकळत बसावे लागते. याध्ये लोकांचा वेळ व पैसा खर्च होतो. या पार्श्वभूमीवर सीईओ वाघमारे यांनी हा निर्णय घेतला आहे. वाशिम जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर नव्याने रुजू झालेले वैभव वाघमारे यांनी पहिल्या दिवसापासुनच आपल्या लोकाभिमुख आणि पारदर्शक कारभारामुळे वाशिमकरांवर आपली छाप पाडली आहे. महत्वाची बैठक असो... चर्चा, सुनावणी, लोकांची तक्रार... काहीही असो, त्यांच्या दालनाची दोन्ही दरवाजे सताड उघडीच असतात. अनेक वेळा लोक बैठका सुरू असतानाही तक्रार वा निवेदने घेऊन येतात. दि. 20 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात एका महत्त्वाच्या विषयावर सुनावणी सुरू असताना काही ग्रामस्थ आपल्या गावातील तक्रार घेऊन आले होते. सीईओ वाघमारे यांनी सुरुवातीला त्यांना नंतर या म्हणुन परत पाठवले परंतु काही क्षणात त्यांना दालनात बोलवुन त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. परंतु आलेल्या लोकांच्या समस्येचे काही कारणांमुळे संपूर्णपणे समाधान होऊ शकले नाही, ही बाब वाघमारे यांच्या लक्षात आली. त्यांनी तातडीने सर्व विभाग प्रमुखांना आपल्या कक्षात बोलावून याबाबत चर्चा केली. आपला प्रस्ताव मांडला आणि जिल्हा परिषदेसाठी एक तक्रार निवारण दिवस ठरविण्यात आला. यासाठी तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्याचे निर्देश सामान्य प्रशासन विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यशवंत सपकाळे यांना दिले. तसेच लोकांच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी प्रत्येक महिन्यातील तिसरा गुरुवार हा दिवस निवडण्यात आला. या दिवशी फक्त लोकांच्या समस्या ऐकुन घेतल्या जातील आणि त्यावर उपाय योजना करण्यात येतील. यामध्ये टपालाद्वारे नियमित येणाऱ्या तक्रारीसह प्रत्यक्ष लोकांनी आणलेल्या तक्रारीबाबत चर्चा करण्यात येणार आहे. या दिवशी सर्व विभाग प्रमुख आणि तक्रारीशी संबंधित असलेले इतर कर्मचारी हे एकत्र बसून समोरासमोर त्या समस्येवर समाधान शोधतील. प्रसंगानुरुप तक्रारीचे समाधान तात्काळ करण्यात येईल परंतु जर एखादी समस्या जर तात्काळ सोडवता येणे शक्य नसल्यास संबंधित तक्रारकर्त्यास आवश्यकतेनुसार पुढच्या गुरुवारी बोलवण्यात येईल.

"लोकांनी मोजक्या आणि स्पष्ठ शब्दात, लेखी स्वरुपात आपली तक्रार नोंदवावी. मुख्य तक्रारीसोबत, तक्रारीच्या अनुषंगाने इतर तपशिल जोडले तेरी चालतील. मात्र तक्रार ही जास्तीत जास्त 10 वाक्यात असावी. एकावेळी एकाच विषयाची तक्रार स्विकारली जाईल. लोकांनी विणाकारण अथवा चुकीच्या उद्देशाने, खोटी तक्रार करुन शासनाचा वेळ वाया घालवु नये."

**-वैभव वाघमारे,(भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम**